# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी — २२६२०६०१,२२६९०६०२,२२६४११५०,२२६४११५१ फॅक्स -२२६९ २१०२/२२६९००७.
E-mail : desk2a@dtemaharashtra.gov.in Internet :http/www.dtemaharashtra.gov.in

प्रवेश सूचना

क्रमांक: २अ/एडीएम/२०१७/१०६५
दिनांक : ३१.०८.२०१७

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील प्रथम वर्ष/थेट द्वितीय वर्ष पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबत.....

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील प्रथम वर्ष/थेट द्वितीय वर्ष पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी विहित कालावधीत नोंदणी करु शकलेले नाहीत किंवा अर्धवट नोंदणी करुन सुविधा केंद्रावर जाऊन कागदपत्र पडताळणी करु शकले नाहीत अशा सर्व पात्र विद्यार्थ्यांचे प्रवेश संबंधित संस्थाप्रमुखांनी त्यांच्या संस्थेत जागा रिक्त असल्यास आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करुन त्यांच्या स्तरावर तात्पूरत्या स्वरुपात संपूर्णत: संस्थेच्या जबाबदारीवर दिनांक ३१.०८.२०१७ रोजी पर्यंत करावेत. अशा विद्यार्थ्यांची यादी विभागीय कार्यालयास सदर संस्थेच्या प्रतिनिधीनी प्रत्यक्ष दिनांक ०१.०९.२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत सादर करावी व विभागीय कार्यालयाने दिनांक ०१.०९.२०१७ रोजी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

०१. ज्या उमेदवारांची नोंदणी झालेली नसेल त्यांची विभागीय कार्यालयाच्या Login मध्ये देण्यात आलेल्या Link द्वारे नोंदणी करुन घ्यावी व आवश्यक कागदपत्रे Upload करावीत. उमेदवारांनी स्वत: उपस्थित राहून मूळ कागदपत्रांची पडताळणी करुन घ्यावी.
०२. उमेदवारांचे आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करुन अर्जनिश्चिती करावी.
०३. उमेदवाराचा प्रवेश संस्थेच्या संबंधित अभ्यासक्रमामध्ये Upload करावा.

उपरोक्त कार्यवाही संबंधित विभागीय कार्यालयाने दिनांक ०१.०९.२०१७ रोजीच पूर्ण करावी. संबंधित संस्थेने प्रवेशित उमेदवारांकडून रु.१०००/- Processing Fee आकारावी. सदर शुल्क संबंधित संस्थेने आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचेकडे संबंधित विभागीय कार्यालयामार्फत धनाकर्षाद्वारे तात्काळ सादर करावी.

(चंद्रशेखर ओक, भा.प्र.से.)
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत:-
01) मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष व प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीकरिता सविनय सादर.
02) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक व पुणे यांना माहिती व पुढील कार्यवाहीकरिता.

C:\Users\desk२a\Desktop\date extension.docx